जागृति मासिकांतून घेतलेला लेख. )

# एक नवें तुफान.

लेखक

राजाराम सखाराम भागवत, एम्. ए.

१९१९.

किंमत १ आणा.

# एक नवें तुफान.

( ले. राजाराम सखाराम भागवत, एम. ए. ठाणें., )

[ You cannot always agree with me and I dont shrink from your criticism. I only ask you not to take for granted the truth of every thing said against me by my enemies for I cannot spare time to answer them. I cannot promise to please you always but I can promise to strive my best to serve the Nation, as I judge of service. I cannot promise to agree with and to follow you always; the duty of a leader is to lead; while he should always consult his colleagues and listen to their advice, the final responsibility before the public must be his, and his therefore the final decision. A general should see furthar than his officers and his army, and cannot explain while battles are going on, every move in the campaign He is to be justified or condemned by his results.

Annie Besant's Presidential address at the Indian National Congress 1917. ]

राजकारणाचें वातावरण प्रायः कधींच शान्त नसतें. मानवजातीची राजकीय चळवळ म्हणजे बहुधा तुफानांची मालिका होय. सामाजिक औद्योगिक, शैक्षणिक चळवळी वादळी वातावरणांत राजकारणाइतक्या गुरफटलेल्या असत नाहींत. पण राजकीय चळवळींचा स्वभावच असा आहे कीं, तुफान केल्याविना ती आपलें अभीष्ट साध्य करूं शकत नाहीं. इसापनीतींतल्या नावाड्याप्रमाणें वारा जरा पडलेला व समुद्र जरा शांत पाहिला म्हणजे कोणीही खुशालचंद माणसानें राजकारणाच्या पाण्यावर शीड उभारून गमतीखातर सहल करण्यास पुढें सरसावूं नये. कारण लहान दिसणारी लाट थोड्याच वेळांत पर्वतप्राय होते, शांत वाटणारे वारे अल्पावधींत झुंज खेळूं लागतात, व पांच मिनिटांपूर्वीं जेथें सामसूम दिसत होतें तेथें आका-

शांत कृष्णवर्णी मेघराजांच्या अंगावर बिजलीची चमक पडावयास लागून प्राणान्तसमय आल्यासारखा भासतो; व असल्या वादळांत अतिशय कुशल नावाड्याचें तारूंहा क्षणोक्षणीं गडप होईल असा सर्व घरकोंबड्या माणसांस रंग दिसूं लागतो. त्याची राजकीय कुंडली आधींच वर्तवून पुष्कळदां त्याचा मृत्युकाळही ते आपल्याशींच निश्चित करितात. पण हा वादळांत सांपडलेला नावाडी जर जातिवंत नावाडी असेल तर तो यत्किंचितर्हा न डगमगतां आपलें कौशल्यसर्वस्व खर्च करून नुसतें आपलें तारूं तरतें ठेवितो. इतकेंच नव्हे तर वादळ नेईल तिकडे न जातां आपण पूर्वीं निश्चित केलेल्या मार्गानेंच पुढें जात असतो.

राजकीय चळवळीचें हें वादळी स्वरूप जरी शान्तपणें प्रगति करूं इच्छिणाऱ्यास अगदीं नापसंत असलें, तरी त्यास इलाज नसतो, व कोणीही राजकीय पुढारी त्याची तक्रार करीत नाहीं. तशी तक्रार करणें म्हणजे सती जाण्यास तयार असलेल्या स्त्रीनें अंग भाजल्याची तक्रार करण्यासारखें हास्यास्पद होय. राजकीय चळवळीचें स्वरूप जोंवर हें असें आहे तोंपर्यंत मला वादळांत जावयाचें नाहीं असा हट्ट धरून बसणारास सर्व राजकारणच वर्ज्य करावें लागेल. ज्यास या चळवळींत पडणें असेल त्यानें सर्व धक्के चपेटे मुकाट्यानें सोसले पाहिजेत. गेले चार पांच महिने मिसेस बेझंट या एका मोठ्या वावटळींत सांपडलेल्या आहेत व त्या वावटळींत हिंदुस्थानच्या राजकारणाचें तारूं मार्गभ्रष्ट होणार नाहीं यासाठीं त्या अविश्रांत मेहेनत करीत आहेत. त्यांच्या वयास आज बहात्तरांवर वर्षे झालीं आहेत. इतक्या अवधींत त्यांनीं कित्येक वादळें पाहिलीं आहेत व अनेक वादळांत सुकाणावरचा हात घट्ट करून आपलें गलबत योग्य मार्गानें वहिवाटलें आहे. या वादळांत त्यांची इतिश्री होणार असें जरी पुष्कळ प्रेक्षकलोक म्हणत असले तरी आपला मार्ग सत्य आहे असा त्यांस भरंवसा आहे, व आपण यांतून नीट पार पडूं अशी त्यांस उमेद आहे. पुढें काय होणार तें पुढें दिसेल, त्याविषयीं आज निश्चित असें कोणी सांगूं शकणार नाहीं व सांगितलें तरी कोणी ऐकणार नाहीं. बाई आपली जबाबदारी शिरावर वाहण्यास पूर्ण समर्थ आहेत. पण या वादळामध्यें कित्येकांची दिशाभूल होण्याचा संभव आहे. तुफान माजलें म्हणजे मार्गदर्शक आकाशज्योतींस मेघराज आपल्या जवनिकेंत गुंडाळतो व ज्याच्यापाशीं स्वतःचें असें होकायंत्र नाहीं त्यास भ्रमांत

पाहतो. अशी आज पुष्कळांची स्थिति झाली आहे. कित्येकांस आजच्या राजकारणांत मिसेस बेझंट यांचे हेतूंविषयीं संशय येत आहे. कित्येकांना त्यांची बुद्धि चळली असें वाटूं लागलें आहे. राजकारणांत काय किंवा कोठें-ही काय व्यक्ती—व्यक्तीमध्यें मतभेद होणारच. त्याबद्दल कोणी कोणास नांवें ठेवण्याचें कारण नाहीं. पण जेव्हां मतभेदाच्या मुळाशीं असद्धेतूंचा संशय येऊं लागतो, जेव्हां मतभेद हे कार्याबद्दल नसून व्यक्तींबद्दल आहेत अशी समाजाची भावना होऊं पहाते, तेव्हां राजकारणाच्या कार्यास एक नवीन विघ्न उत्पन्न होतें. मतभेद योग्य असले तरी कोणत्याही पुढाऱ्यावरील विश्वास डळमळीत होणें ही गोष्ट त्या पुढाऱ्याच्या राजकीय कार्यक्षमतेस कमीपणा आणते. अशा परिस्थितींत वादळामध्यें ज्या गोष्टी जनतेस दिसत नाहींत किंवा वादळाचा फायदा घेऊन ज्या गोष्टींचा मुद्दाम जनतेसमोर विपर्यास करण्यांत येतो त्या त्यांचेसमोर शांतपणानें मांडणें हें अगदीं आवश्यक होतें. हें आवश्यक कार्य उरकण्याचा या लेखकाचा आज संकल्प आहे.

या लेखांत राजकीय गोष्टींचा स्वतंत्रपणें विचार करावयाचा नाहीं. तें धर्मजागृतीचें क्षेत्र नाहीं. मिसेस बेझंट यांचे विचारांची संगति समजण्यास जितक्या राजकीय गोष्टींची चर्चा करणें जरूर आहे, तितकीच धरून आम्हीं आटपतें घेणार आहों. कारण हल्लींच्या राजकीय प्रश्नांवर मत प्रकट करण्याचा या लेखाचा हेतु नसून मिसेस बेझंट यांच्या राजकारणविषयक धोरणावर कांहीं प्रकाश पाडण्याचा हेतु आहे. मिसेस बेझंट यांचीं मतें सर्वांस मान्य होतील अशी आमची अपेक्षा नाहीं. पण त्यांच्या मतांत कांहीं सुसंगतता आहे, त्यांच्या धोरणांत कांहीं दूरदृष्टि आहे हें वाचकांच्या नजरेस आणून, जरी त्यांचें व मिसेस बेझंट यांचें एकमत झालें नाहीं तरी मिसेस बेझंट यांचेविषयीं उत्पन्न झालेला अविश्वास दूर करावा व त्यांचे हेतूवर केलेल्या आरोपांचें निरसन करावें अशी आमची अपेक्षा आहे.

प्रथम हल्लींच्या वादांत ज्या खोट्या गोष्टी खऱ्या म्हणून प्रसृत करण्यांत येत आहेत त्यांचा निकाल करूं. बांडगुळें उपटलीं म्हणजे पुढचें कार्य सुलभ होईल.

मुंबईचे शेठ जमनादास द्वारकादास यांनीं प्रथम सत्याग्रहाच्या शपथेवर सही केली. पण ती मध्यंतरीं काढून घेतली, व नंतर पुनः घातली. मध्यं

तरीं सही काढून घेतली ती मिसेस बेझंट यांच्या अत्याग्रहावरून काढून घेतली असें ‘ केसरी ’ चें म्हणणें आहे. हें निव्वळ खोटें आहे. प्रस्तुत लेखकानें या गोष्टीची चवकशी केलेली आहे. ज्यास प्रस्तुत लेखकाची माहिती विश्वसनीय वाटत नसेल त्यानें स्वतः चवकशी करून काय तें खरें शोधावें. पण गप्पांवर विश्वास ठेवूं नये.

रौलेट कायदा हा चांगला कायदा आहे, त्यांत राजनिष्ठ माणसास तक्रार करण्यासारखें कांहीं वाईट नाहीं, असें मिसेस बेझंट यांचें मत असल्याची बातमी ॲसोशिएटेड प्रेसनें प्रसिद्ध केली होती, ती गोष्ट खोटी. असोशिएटेड प्रेसनेंही आपली बातमी चुकीची असल्याचें नंतर प्रसिद्ध केलें. पण बऱ्याच वर्तमानपत्रांनीं पहिली चुकीची बातमी तेवढीच प्रसिद्ध केली, व त्यानें गैरसमजूत मात्र लोकांत पसरली. रौलेट कायदा चांगला आहे,त्यांत कांहीं वाईट नाहीं, असें मिसेस बेझंट यांचें मत नव्हतें व नाहीं. कायदा पास होण्यापूर्वी त्यांनीं आठ दहा लेख त्यासंबंधानें न्यू इंडियांत लिहिले व त्यांतील दोष सविस्तरपणें चव्हाट्यावर आणिले. कायद्यांत कांहीं दुरुस्त्या होऊन तो पुढें पास झाला. या दुरुस्त्यांनीं कायद्याची नांगी कांहीं नरम पडली. पण जरी दुरुस्त्या झाल्या असल्या तरी कायदा वाईट आहे, त्यांचा निषेध करणें अगदीं अवश्यक आहे, असेंच मिसेस बेझंट यांनीं तो कायदा पास झाल्यावरही दोन अग्रलेख लिहून न्यू इंडियांत प्रतिपादिलें होतें. मी विलायतेंत या कायद्याविरुद्ध चळवळ करीन असेंच त्यांनीं विलायतेस जातांनाही सांगितलें आहे. राजनिष्ठ नागरिकास या कायद्यांत तक्रार करण्याजोगें ( nothing to which a loyal citizen can object ) कांहीं नाहीं हें जें मत त्यांच्या तोंडी घालण्यांत आलें होतें, त्याच्या ऐवजीं “ ह्या कायद्यांत ज्या दुरुस्त्या झाल्या आहेत त्यांनीं त्याचें स्वरूप असें झालें आहे कीं, राजनिष्ठ नागरिकास तो कायदा मोडून धाब्यावर बसवितां येईल असें कलम त्यांत आतां राहिलें नाहीं व म्हणूनच इतर कायदे मोडण्याचा प्रश्न उत्पन्न झाला ” असें मिसेस बेझंट यांचें म्हणणें होतें. कायदा चांगला कीं वाईट याविषयीं मिसेस बेझंट व इतर पुढारी यांचेमध्यें कांहीं मतभेद नाहीं. सर्वांसच तो अतिशय आक्षेपार्ह वाटत आहे. मिसेस बेझंट यांचें इतकेंच म्हणणें आहे कीं, जोंपर्यंत देशांत पूर्ण स्वस्थपणा नाहीं व शांततेचा भंग होण्याचा संभव आहे तोंपर्यंत या कायद्याविरुद्ध जी चळवळ कराव-

त्याची ती बंद ठेवावी, शांतताभंगाचा संशय नाहींसा झाला म्हणजे कायद्याविरुद्ध सनदशीर चळवळ पुनः सुरू करावी. पण आजच कायद्याविरुद्ध जोराची चळवळ केल्यास लोकांस डोकें शांत ठेवणें कठीण पडेल व दुष्परिणाम ओढवतील. ज्या कारणास्तव महात्मा गांधी यांनीं सत्याग्रहाची चळवळ बंद ठेविली त्याच कारणास्तव रौलेट कायद्याविरुद्ध चळवळ दोन दिवस बंद ठेवावी असें त्यांचें म्हणणें आहे. लो. टिळक यांस इंग्रजी येत नाहीं असें मिसेस बेझंट म्हणाल्याचें बाबू बिपिनचंद्र पाल सांगतात. ही बातमी खोटी आहे. मिसेस बेझंट यांनीं त्याचा साफ इनकार करून अशी पृच्छा केली आहे कीं, मीं लो. टिळक यांचीं इंग्रजी पुस्तकें वाचलीं नाहींत व त्यांचीं इंग्रजी व्याख्यानें ऐकिलीं नाहींत अशी लोकांची कल्पना आहे कीं काय ?

कॉंग्रेसतर्फे जें डेप्युटेशन विलायतेस जावयाचें त्याचीं सूत्रें माझ्या हातीं पाहिजेत, तीं माझ्या हातीं न दिल्यास मी हिंदुस्थानांतील पुढारी लोकांस डेप्युटेशनवर तुम्हीं जाऊं नका असें सांगेन असें बाई म्हणाल्याचें मि. बिपिनचंद्र पाल म्हणतात. ही देखील निवळ गप्प आहे. ज्या माणसाजवळ बाई असें बोलल्याचा पालबाबू हवाला देतात त्या गृहस्थानें वर्तमानपत्रांत असें प्रसिद्ध केलें आहे कीं, मजपाशीं बाई असें मुळींच म्हणाल्या नाहींत, तेव्हां या गोष्टीचें पिष्टपेषण करण्याचें कारण नाहीं. आतां कांहीं वादग्रस्त प्रश्नांकडे वळूं. दिल्लीकॉंग्रेसमध्यें मिसेस बेझंट व राष्ट्रीय पक्षाचे इतर अनुयायी यांचेमध्यें मतभेद उत्पन्न झाला. हा मतभेद उत्पन्न होण्याचें कारण मिसेस बेझंट यांस कॉंग्रेस आपल्या मुठींत ठेवावयाची होती, पण इतरांनीं त्यांचें वर्चस्व कमी केल्यामुळें कांहीं तरी कुरापती काढून त्यांनीं मतभेद उत्पन्न केला, खरोखरी मिसेस बेझंट व इतर राष्ट्रीय पक्षाचीं माणसें यांमध्यें मतभेद नाहीं आहे, व जरी असला तरी बहुमत ज्या बाजूस आहे ती बाजू मिसेस बेझंट यांनीं कबूल केली पाहिजे असें बाईच्या विरुद्धपक्षाचें म्हणणें आहे.

दिल्लीकॉंग्रेसमध्यें दोन गोष्टींबद्दल मिसेस बेझंट यांचा विशेष कटाक्ष होता. प्रांतिक स्वराज्य ही एक व सर्वांचें ऐक्य ही दुसरी.

जर आपणास सरकाराशीं कांहीं मागणी करावयाची असली तर ती एकमुखानें झाल्याशिवाय तिला फारसा जोर येणार नाहीं ही गोष्ट सर्वच

लोकांस कबूल होण्यासारखी आहे. मागणीच्या वेळीं फूट पडून जितकें नुकसान होईल त्यापेक्षां फूट पडूं नये याकरितां जरी मागणी थोडी कमी केली तरी त्यांत तितकें नुकसान नाहीं, हेंही म्हणणें पुष्कळांस पटेल. देशांत पक्ष नकोत असें नाहीं, पण जेव्हां सर्व पक्षांनीं तिसऱ्याकडे मागणी करावयाची आहे तेव्हां सर्व पक्षांनीं एकवटून आपापले मतभेद विसरण्यास शिकणें जरूर आहे, या धोरणानें मॉंटेग्यू-चेम्सफर्ड रिपोर्ट प्रसिद्ध झाल्यावर मिसेस बेझंट यांनीं सर्व पक्षांत एकी करण्याचा विशेष प्रयत्न केला. ज्यांना मुंबईकॉंग्रसच्या सब्जेक्ट कमिटींतील कामाची माहिती असेल त्यांना या ऐक्याच्या बाबतींत मिसेस बेझंट यांनीं किती खटपट केली होती तें सांगण्याची जरूरी नाहीं. ऐक्याची जरूर भासल्यामुळें मुंबईकॉंग्रेसला सर्व राष्ट्रीय पक्ष व अर्धा नेमस्त पक्ष यांचा पाठिंबा होता. नेमस्त पक्षाचे मुंबईचे कांहीं पुढारी, मद्रासचे सर्व पुढारी, संयुक्त प्रांतांतले कांहीं बडेबडे पुढारी यांनीं त्या कॉंग्रेसला दुजोरा दिला होता. जे नेमस्ताग्रणी या कॉंग्रेसमध्यें आले नव्हते ते सर्व तिच्या विरुद्ध होते असें नाहीं. कित्येक नेमस्त लोक मुंबईकॉंग्रेसला येण्यास तयार होते, पण त्यांचे कांहीं पुढारी कॉंग्रेमधून फुटून गेल्यामुळें त्यांस आपल्या मित्रमंडळीस एकदम तोडणें बरें वाटलें नाहीं. जे नेमस्त पुढारी मुंबईकॉंग्रेसला विरोध करीत होते त्यांनीं आपली निराळी सभा भरविली. या दोन्ही सभा झाल्यावर ही गोष्ट स्पष्ट झाली कीं, नेमस्त सभा व मुंबईकॉंग्रेस यांमध्यें जरी कांहीं मतभेद असला तरी दोन निराळ्या सभा काढण्याइतका मोठा तो नव्हता. दोन्ही सभांनीं मॉंटेग्यू–चेम्सफर्ड रिपोर्टामध्यें ज्या सुधारणा सुचविल्या त्याही बहुतेक एकच आहेत. त्या पाहून पुष्कळ लोक विचारूं लागले कीं, जर मतभेद फारसा नाहीं तर नेमस्त पक्षानें कॉंग्रेस सोडण्यास काय कारण आहे? मुंबईकॉंग्रेसनंतर तीन महिन्यांनीं दिल्लीकॉंग्रेस झाली. यांत अधिक एकी होण्याची शक्यता उत्पन्न झाली होती. ना. शास्त्री यांचा पक्ष त्या कॉंग्रेसला मिळाला होता. अशा स्थितींत मुंबईकॉंग्रेसमध्यें नेमस्त पुढाऱ्यांशीं संगनमत करून ज्या गोष्टी कायम ठरविल्या होत्या त्यांत जर फिरवाफिरव करण्यांत न येती तर ना. शास्त्री यांचा पक्ष दिल्लीकॉंग्रेसला कायमचा चिकटता, व मग ना. सुरेंद्रनाथ बानर्जी आदिकरून इतर बाहेर राहिलेले नेमस्ताग्रणीही हळू हळू कॉंग्रेसशीं मिळते येते अशी ती संधि होती. ना. शास्त्री यांचा पक्ष म्हणजे

के. गोखले यांचा पक्ष होय. या पक्षास नेमस्त वर्गामध्यें एक प्रकारचें महत्व आहे व जर हा पक्ष दिल्लीकाँग्रेसनें आपलासा करून घेतला असता तर बहुतेक सर्व नेमस्त पक्ष काँग्रेसचा पुरस्कर्ता आहे असें ठरून नंतर लौकरच सर्व नेमस्तपक्ष त्यानंतर काँग्रेसशीं पूर्वींप्रमाणें सहकार्य करूं लागता यांत संशय नाहीं. या वेळेस ज्यांनीं एकीचें महत्व ओळखलेलें होतें अशा पुढाऱ्यांचें–व मिसेस बेझंट त्यांत आग्रगण्य होत्या–जर असें म्हणणें होतें कीं, मुंबईस ज्या गोष्टी राष्ट्रीय व नेमस्त पक्षानें निश्चित केल्या आहेत त्यांत नेमस्त पक्षाच्या संमतीशिवाय फिरवाफिरव करूं नये तर त्यांत वावगें तें काय ? मुंबईची काँग्रेस सुधारणांचा विचार करण्याकरितांच म्हणून मुद्दाम भरविलेली होती. ती हजार विषयांचा विचार करणारी वार्षिक काँग्रेस नव्हती. ज्या गोष्टींकरितां म्हणून ही जादा काँग्रेस मुद्दाम भरली व ज्या गोष्टींचा तेथें मवाळजहालांनीं विशेष खल करून दोघांच्या संमतीचा म्हणून सरकारपुढें टाकण्यास एक संयुक्त खर्डा तयार केला ती गोष्ट तीन महिन्यांनीं बदलून दोघां पक्षांमध्यें झालेल्या ठरावास हरताळ फासणें ही गोष्ट अयोग्य होती. त्यापासून फार तोटे झाले आहेत हें आज दिसतच आहे. मुंबईच्या काँग्रेसला जितका नेमस्तांचा पाठिंबा होता त्यांतला पुष्कळ दिल्लीनंतर कमी झाला. राष्ट्रीय पक्ष व नेमस्त पक्ष हे परस्परांस दूर झाले, व नेमस्त पक्षास आपलें डेप्युटेशन निराळें असावें असें वाटण्यास एक सबळ कारण मिळालें. राष्ट्रीय पक्षांतही दुही झाली. काँग्रेसच्या डेप्युटेशनवर ज्या तोलाचीं माणसें जावयास पाहिजेत त्यांपैकीं कांहीं जाण्यास नाकबूल झालीं व कांहींचा उत्साह थंडावला. अध्यक्ष पंडित मदन मोहन हे जाणार असें वर्तमानपत्रें सांगतात; पण जातील तेव्हां खरें. आज देशांत सर्वत्र दुही आहे व त्याचें मूल कारण दिल्लीच्या काँग्रेसमध्यें आहे, हें कोणाही चाणाक्ष माणसास समजेल. ही दुही पुढें देशास न जाचो म्हणजे मिळविली. बरें ही दुही करून मिळविलें काय ? तर मुख्यतः प्रांतिक स्वराज्य तात्काळ मागण्याचा ठराव. एकंदर सर्व स्वराज्य पंधरा वर्षांत काँग्रेसला पाहिजे आहे. त्यांतलें प्रांतिक स्वराज्य सहा वर्षांनीं हवें असें काँग्रेस म्हणत होती. ती सहा वर्षांची गोष्ट आज हवी या मागणीकरितां एकी मोडणें म्हणजे कालिदास म्हणतो त्याप्रमाणें–

‘ अल्पस्य हेतोर्बहु हातुम् इच्छन् ’

असें करणें होय.

प्रांतिक स्वराज्यासंबंधानें पुष्कळ लोक विचारतात कीं, तें एकदम मागितलें तर त्यानें काय गेलें ? जितकें कमी मागाल तिततकें कमी मिळेल. अधिक मागितल्यासच कांहीं अधिक पदरांत पडण्याचा संभव आहे. पण असें विचारणारे लोक हें विसरतात कीं हा कमी मागण्याचा किंवा अधिक मागण्याचा प्रश्न नसून परस्परविरोधी किंवा परस्परसुसंबद्ध मागणी करण्याचा प्रश्न आहे. जे दहापंधरा वर्षांत सबंध होमरूल मागतात ते योग्य असल्यास प्रांतिक स्वराज्य लवकर मागण्यास कचरतील असें आमच्या वाचकांस वाटतें काय ? तर या प्रश्नाचा जरा बारकाईनें विचार करूं.

१९१६ च्या कॉंग्रेसमध्यें कॉंग्रेस लीग स्कीम पास होऊन ती राष्ट्राची मागणी म्हणून ठरली. तींत राज्यकारभाराचीं कांहीं खातीं लोकांच्या ताब्यांत द्यावयाचीं व कांहीं नोकरशाहीकडे पाठवावयाचीं हें तत्त्व ( ज्यास Diarchy चें तत्त्व म्हणतात व ज्यास आपण येथें ‘ सत्ताविभाग ’ असें म्हणूं तें ) नव्हतें-निदान तें स्पष्ट नव्हतें. मॉंटेग्यु साहेबांच्या योजनेंत तें अगदीं प्रमुख आहे. आज मतदारसंघ तयार नाहींत, तेव्हां आम्हीं कांहीं खातीं लोकांच्या हातीं देऊं; व तीं नीट चालल्यास आणखी खातीं त्यांचेकडे सोंपवूं. योग्य मतदारसंघाच्या अभावीं अननुभवी लोकांच्या हातांत अशी हप्त्या-हप्त्यानेंच सत्ता दिली पाहिजे, या आदितत्त्वावर मॉंटेग्युसाहेबांची योजना रचलेली आहे. हें तत्त्व प्रांतिक सरकारांस लावून कांहीं प्रांतिक खातीं ते लोकांच्या हातीं देण्यास तयार आहेत. पण वरिष्ठ सरकारास हें तत्त्व लावण्याचा समय अद्याप आला नाहीं, तो पुढें येईल, अशी त्यांची समजूत आहे. तेव्हां ते वरिष्ठ सरकारांत आज कोणतेंच खातें लोकांस देण्यास तयार नाहींत. मॉंटेग्युसाहेबांचा रिपोर्ट बाहेर आल्यावर या रिपोर्टाच्या चौकटींत आपण आपल्या कॉंग्रेस-लीग योजनेपैकीं पुष्कळ गोष्टी बसवाव्या, पण ही चौकटच मोडूं नये असें हिंदुस्थानांतील सर्व पुढाऱ्यांनीं एकजात ठरविलें. रिपोर्ट सरकारचा आहे. तेव्हां त्यांतील चौकट मोडून टाका असें आम्हीं म्हटल्यास कोणी ऐकणार नाहीं. चौकट मोडण्याचा आग्रह धरणें म्हणजे सरकारी योजनेचाच विध्वंस होय. तसा आपण विध्वंस केला तर कॉंग्रेस-लीग स्कीमचें तूप गेलें व मॉंटेग्यू स्कीमचें तेलही गेलें असें होऊन कांहीं तरी कःपदार्थ, धुपाटणें, हातीं येईल असें सर्व विचारी माणसांस वाटलें. कॉंग्रेस-लीग स्कीमच्या विरुद्ध जर सरकार आहे तर ती मिळणें मुष्किलीचें

आहे; मॉंटेग्यु स्कीमचा विध्वंस करणें जरी कठीण नसलें तरी विध्वंस झाल्यावर या दोहोंपेक्षांही कमी भरींव दान पदरीं पडण्याचें भय आहे; अशा स्थितींत मॉंटेग्यू योजनेची चौकट कबूल करून त्यांत आपणास पाहिजे त्या दुरुस्त्या बसवाव्या म्हणजे आपल्या मागणीस सरकारास नाकारणें कठीण पडेल असा सर्व राष्ट्रानें एकमतानें विचार केला. जरी Diarchy किंवा सत्ता-विभाग हिंदुस्थानांतील लोकांस प्रिय नव्हता तरी तो मॉंटेग्यु योजनेच्या चवकटीसारखा असल्यामुळें तो स्वीकारावा असें पुढाऱ्यांनीं ठरविलें. Diarchy च्या मार्गानें लोकांच्या हातीं हळू हळू कारभार देण्यास आम्हीं तयार आहों असें जर सरकारी रिपोर्ट म्हणत असेल, तर हें Diarchy चें तत्त्व आम्हांस मान्य आहे, आम्हीं तें प्रांतिक सरकारांत स्वीकारण्यास तयार आहों; पण तुमचेंच हें तत्त्व तुम्ही वरिष्ठ सरकारासही लाविलें पाहिजे असें म्हणण्याची लोकांस मुभा पाहिजे होती. मॉंटेग्यु साहेब वरिष्ठ सरकारांत लोकांस कांहीं सत्ता देण्यास तयार नव्हते तेव्हां त्यांचेंच तत्त्व प्रांतिक सरकारांत कबूल करून तें त्यास वरिष्ठ सरकारास लागू करण्यास लावणें अधिक संभवनीय आहे असा पुढाऱ्यांनीं पोक्त विचार केला. वरिष्ठ सरकारांत लोकांस थोडी तरी सत्ता मिळून त्यांचा तेथें चंचुप्रवेश आज न झाला तर पुढें अशी संधि लवकर येणार नाहीं; व एकदां चंचुप्रवेश करून ठेविला असला म्हणजे पुनः पुनः चळवळ करून वरिष्ठ सरकारांतही लोकांस हातपाय पसरावयास सांपडतील; चंचुप्रवेश आज न झाल्यास वरिष्ठ सरकारच्या सुधारणेचा दरवाजाच अजी बंद होऊन तो पुनः उघडणें कठीण जाईल; तेव्हां हा चंचुप्रवेश वरिष्ठ सरकारांत होण्यासाठीं सत्ताविभागाचें तत्त्व प्रांतिक सरकारांत आपण मान्य केलें पाहिजे ही विचारसरणी सर्व पुढाऱ्यांस पसंत पडली व तिच्या अनुरोधानें मुंबईकॉंग्रेसचें धोरण राहिलें होतें. अशा स्थितींत प्रांतिक स्वराज्य आतांच पूर्ण पाहिजे अशी मागणी करून जर Diarchy आपण फेंटाळून लाविली तर तीच Diarchy वरिष्ठ सरकारांत आपण कोणत्या तोंडानें मागणार ? Diarchy व्यवस्था लोकांनीं मान्य केल्यास सरकारचें तें मूळ तत्त्व असल्यानें, लोकांनीं जोर धरल्यास तें वरिष्ठ सरकारांतही मिळण्याचा संभव आहे; पण तें अमान्य केल्यास फार झालें तर सरकार प्रांतिक स्वराज्य देईल पण वरिष्ठ सरकारांत लोकांचा हात शिरकूं देणार नाहीं. असा प्रांतिक सत्तेचा

व वरिष्ठ सत्तेचा अन्योन्याश्रय आहे. हा अन्योन्याश्रय मुंबईकाँग्रेसनें ओळखला, पण ज्या मार्गानें मुंबईकाँग्रेस पुढें जात होती तो मार्गच दिल्लीस प्रांतिक स्वराज्याची तात्कालिक मागणी झाल्यामुळें खुंटला, व वरिष्ठ सरकारांत सुधारणा होण्याची आशा बरीच कमी झाली. ज्या मार्गानें मुंबईकाँग्रेस गेली त्याच मार्गानें दिल्लीकाँग्रेस गेली असती व थोडें पुढें जाऊन एखादी मागणी अधिक करती तर प्रश्न वेगळा होता. पण हा प्रकार तसा नाहीं. जो व्यूह मुंबईकाँग्रेसनें रचला व ज्या विचारसरणीवर रचला ती दिल्ली येथें ढांसळून पडली अशी वस्तुस्थिति आहे व यामुळेंच प्रांतिक स्वराज्याच्या मागणीस दिल्ली येथें एका पक्षाकडून कसून विरोध करण्यांत आला. प्रांतिक सरकारच्या हक्कापेक्षां वरिष्ठ सरकारांतील हक्क अधिक किमतीचे आहेत व पूर्वोक्त हक्कावर फाजील जोर दिल्यानें जर उत्तरोक्त हक्क मिळणें अधिक कठीण होत असेल तर तसलें धोरण देशाच्या हिताचें नाहीं, ही मिसेस बेझंट यांची विचारसरणी आहे. दिल्लीकाँग्रेसमध्यें त्यांनीं हेंच धोरण ठेविलें. तें कोणास पटेल, कोणास न पटेल, तो प्रश्न अलाहिदा आहे. पण तें न पटणाऱ्यांसही इतकें वेडेपणाचें वाटण्याजोगें तें खास नाहीं कीं त्यांसाठीं मिसेस बेझंट यांचे हेतूच्या शुद्धतेविषयीं किंवा बुद्धीच्या विकलत्वाविषयीं शंका घेण्याची जरूर पडावी.

राष्ट्रीय पक्षाचें असें म्हणणें आहे कीं, जर प्रांतिक कायदे कौन्सिलांनीं प्रांतिक स्वराज्य एकदम मागितलें तर दिल्लीस ती मागणी करण्यास काय हरकत आहे ? यावर आमचें उत्तर असें आहे कीं, काँग्रेसची जबाबदारी मोठी आहे. तशी प्रांतिक कौन्सिलाची नाहीं. प्रांतिक सरकारच्या चुका काढणें हेंच कायतें बहुशः लोकपक्षाचें कौन्सिलांतील काम असतें, पण काँग्रेसला संबंध देशाचा विचार करून धोरण ठरवावयाचें असतें. काँग्रेस-लीग स्कीम, हिंदुमुसलमानांचा समेट, माँटेग्यु स्कीममधील सुधारणा इत्यादिकांची जबाबदारी जशी काँग्रेसवर आहे तशी प्रांतिक कौंसिलांवर नाहीं. काँग्रेसला जसा आगापिच्छा आहे तसा कौन्सिलास नाहीं. काँग्रेस जशी आपल्या धोरणानें बांधलेली आहे व एकदां एका काँग्रेसनें स्वीकारलेलें धोरण जसें दुसऱ्या काँग्रेसला भरींव कारणाशिवाय सोडतां येणार नाहीं तसें कौन्सिलाचें नाहीं, काँग्रेसच्या एकसूत्री धोरणानें निरनिराळीं कौन्सिलें बांधलेलीं नाहींत तेव्हां अशा स्थितींत कौन्सिलांनीं ठराव केला म्हणून तो

आपल्या धोरणाच्या विरुद्ध असतांही कॉंग्रेसनें मान्य करणें शहाणपणाचें नाहीं. The Congress must take an Imperial and not a Provincial view असें कॉंग्रेसमध्यें मि. सी. पी. रामस्वामी ऐयर यांनीं जें बोलून दाखविलें त्याचें इंगित हेंच होय.

दिल्लीकॉंग्रेसविषयीं मिसेस बेझंट यांचे विरुद्ध आणखी एक मुद्दा पुढें करण्यांत येतो. तो असा कीं, जर दिल्ली येथें बहुमत बाईच्या विरुद्ध होतें तर त्यांनींही बहुमताप्रमाणें चाललें पाहिजे असें म्हणणें म्हणजे लोकसत्ते-विषयीं, राजकीय संस्थांविषयीं, तसेंच बहुमताच्या अधिकाराविषयीं अ-क्षम्य अज्ञान प्रकट करणें होय. जर बहुमत कोणाच्या विरुद्ध असेल तर त्या संस्थेवर विरुद्ध मंडळीचें वर्चस्व चालूं नये, त्या संस्थेच्या नांवाचा आपल्या मतसमर्थनार्थ त्या मंडळीस उपयोग करण्याचा अधिकार नाहीं, बहुमताप्रमाणें ठराव पास व्हावयास पाहिजे, व बहुमताच्या ठरावांची अंमलबजावणी करण्याचा त्या संस्थेस हक्क आहे; येथपर्यंत आम्हांस सर्व कबूल आहे. पण जें मत आपणास अमान्य आहे, तें बहुमतास योग्य दिसतें म्हणून आपणही मान्य केलें पाहिजे, त्याविरुद्ध बोलण्याचा, लिहिण्याचा चळवळ करण्याचा कोणास हक्क नाहीं असा त्याचा अर्थ होत नाहीं. कायदे कौन्सिलांत लोकांच्या पुढाऱ्यांस बहुमत प्रायः मिळत नाहीं म्हणून ते त्या-विरुद्ध आपापल्या चळवळी करीत नाहींत काय ? ॲस्किथ साहेबांस आज बहुमत मिळालें नाहीं, म्हणून ते लॉइड जॉर्ज यांचीं मतें कबूल करतील कीं काय ? ते आपल्या मतसमर्थनार्थ चळवळ करितील व त्या चळवळीसाठीं सभा भरवितील, लेख लिहितील, संस्था उभारतील व अशा रीतीनें बहुमत आपल्या बाजूस वळविण्याचा यत्न करतील. त्यांस प्रत्यवाय नाहीं. ज्या पक्षास बहुमत नाहीं त्यानें बहुमत आपल्या पक्षास मिळविण्याचा त्या सं-स्थेंत राहून प्रयत्न करावा हा त्या पक्षाचा जन्मसिद्ध हक्क आहे. हा हक्क काढून घेतल्यास बहुमतावर चालणाऱ्या संस्थांची प्रगति खुंटून त्यांचे बारा वाजतील. कॉंग्रेससारख्या सर्वराष्ट्रीय संस्थांत अनेक पक्ष असावयाचे, त्यांत आज या पक्षाचें बहुमत तर उद्यां त्या पक्षाचें बहुमत, असा प्रकार चालाव-याचा. ज्याचें बहुमत असेल त्याचे ठराव कॉंग्रेस पास करील व ते कॉंग्रेस ठराव म्हणून समजले जाऊन कॉंग्रेस त्यांची अंमलबजावणी करील. हे ठराव ज्या पक्षास मान्य नाहींत त्यानें नवीन खटपट करून बहुमत आपल्या

बाजूचें करण्याच्या मार्गास लागावें व त्यांत त्यास यश आल्यास पूर्वीचे ठराव फिरवून आपल्या मताचे ठराव पास करून अमलांत आणावे हीच अशाप्रकारच्या सर्व राजकीय संस्थांची रीत आहे.

शेवटला प्रश्न सत्याग्रहाचा राहिला. त्यासंबंधानें मिसेस बेझंट यांनीं जें धोरण स्वीकारलेलें आहे, त्याविषयीं पुष्कळ चुकीच्या गोष्टी लोकांत पसरलेल्या आहेत. तेव्हां या मुद्याचा विचार करतांना प्रथम वस्तुस्थितीचें निवेदन करणें जरूर आहे. रौलट कायदा पास होण्याचे अगोदरच सत्याग्रहाच्या चळवळीचा उपक्रम करण्यांत आला होता. त्या वेळीं मिसेस बेझंट यांनीं सत्याग्रहासंबंधानें आपलें धोरण काय तें जाहीर केलेलें आहे. त्या तत्त्वतः सत्याग्रहाच्या ( अर्थात् Passive Resistance ) च्या विरुद्ध नाहींत. सत्याग्रह म्हणजे एकादी आपणांस चुकीची वाटणारी गोष्ट कायद्यानें ठरविली असतां ती मोडून कायद्यांतील शिक्षा शांतपणें भोगणें हा निश्चय होय. या प्रकारास महात्मा गांधी यांनीं आध्यात्मिक व निवृत्तिमार्गाचें उच्च स्वरूप दिलें आहे. तें क्षणभर सोडून देऊन सामान्य जनतेस जो सत्याग्रहाचा साधा अर्थ कळतो तो घेतल्यास तो आणि Passive Resistance हीं एकच आहेत. मिसेस बेझंट या Passive Resistance च्या विरुद्ध नाहींत इतकेंच नव्हे तर अनेक वर्षांमागें सर चार्लस ब्रॅडला व मिसेस बेझंट यांनीं Knowlton pamphlet नांवाचें विलायतेंत सरकारनें मना केलेलें पुस्तक छापून त्यांनीं स्वतः सत्याग्रह अवलंबिलेला होता ही गोष्ट इंग्लंडांतील गेल्या शतकाच्या शेवटच्या भागाचा इतिहास माहीत असलेल्या सर्व लोकांस अवगत आहे. एकादा कायदा अन्यायाचा असला व तो पाळणें एकाद्या शुद्धसत्त्व पुरुषास आपल्या विवेकबुद्धीच्या विरुद्ध आहे असें वाटत असलें तर त्यानें कायदा मोडून कायद्यांत सांगितलेलें प्रायश्चित्त निमूटपणें भोगावें असा हा मार्ग आहे. असें केल्यानें त्या वाईट कायद्याकडे जनतेचें लक्ष जातें, व शिक्षणानें उच्च व आचरणानें चोख असणारे पुष्कळ प्रजाजन जर कायदा मोडण्यास तयार झाले तर जनतेची सहानुभूति ते आकर्षूं शकतात, सरकारचें हंसें होतें व कधीं कधीं पुष्कळ माणसांस तुरुंगांत घालणें अडचणीचेंही होतें व अशा रीतिनें तो वाईट कायदा रद्द करण्यांत येतो. पण माहात्मा गांधींनीं जो सत्याग्रह सुरू केला तो या वरील प्रकारापेक्षां एका अत्यंत महत्त्वाच्या बाबतींत भिन्न होता. रौलट कायदा पास होण्याचे अगोदर त्यांत ज्या दुरुस्त्या कर-

ण्यांत आल्या त्यामुळें त्या कायद्यांत अशी एकही बाब राहिली नाहीं कीं, जी कोणीही सदाचरणी नागरिक मोडण्यास राजी होईल. रौलेट कायद्याचें मुख्य भय आहे तें हें कीं, जरी हा कायदा अराजक-माणसांकरितां आहे असें सरकार म्हणत असलें तरी तें तो कायदा सनदशीर चळवळ करणाऱ्या लोकांस लावणार नाहीं अशी खात्री कोणीं द्यावी ? या कायद्यांचीं कलमें आक्षेपार्ह आहेत ही तक्रार गौण आहे. लोकांची मोठी तक्रार अशी आहे कीं, सरकार कायद्याचा दुरुपयोग करील. आतां जर चांगल्या माणसास मोडतां येतील अशीं कलमें या कायद्यांतून काढून टाकण्यांत आलीं तर त्याविरुद्ध वर सांगितलेला Passive Resistance शक्य नाहीं. कारण जो कायदा विवेकी माणसास मोडतां येण्यास त्याचें मन परवानगी देत नाहीं तो कायदा मोडून लोकांची सहानुभूति मिळविणें अशक्य होय. म्हणून महात्मा गांधी यांनीं आम्हांस हवे ते दुसरे कायदे आम्ही मोडूं अशी आपल्या चळवळींत व्यवस्था केली. दुसरे कोणते कायदे मोडावयाचे हें कमिटीनें ठरवावें व ते कायदे या चळवळींतील अनुयायांनीं मोडावयाचे असें त्यांनीं ठरविलें. अमुक एक प्रकारचे कायदे कमिटी ठरवील असा कांहीं निर्बंध म. गांधी यांनीं घातला नाहीं, इतकेंच नव्हे तर मद्रास इलाख्यांतील एका व्याख्यानांत प्रतिपक्षावरील आक्षेपांस उत्तर देतांना महात्मा गांधी यांनीं स्पष्ट खुलासा केला कीं; ज्या कायद्यांत नीति-अनीतीचा प्रश्न नाहीं ( Laws having a moral sanction ) त्या कायद्यांपैकीं पाहिजे ते कायदे मोडण्याचें कमिटी ठरवील. सरकारास देणें देण्याचे कायदे, ज्या कायद्यांनीं सरकारचा सांपत्तिक योगक्षेम चालतो ते मोडणें यांत नीतीचा प्रश्न नाहीं; व असे कायदे मोडण्यास सांगण्यास आमच्या कमिटीस मुभा आहे; जे लोक सत्याग्रहाची शपथ घेतात त्यांनीं नीतिनियमांशीं संबंध नसलेला कोणताहि कायदा मोडण्यास तयार असलें पाहिजे व म्हणून अमुक एक कायदा मोडा असा कमिटीनें ठराव केल्यास, अशा तयार असलेल्या माणसांच्या सदसद्विवेकबुद्धीवर जुलूम होण्याचा प्रश्नच उत्पन्न होऊं शकत नाहीं, असें महात्माजींनीं त्याच प्रसंगीं उघड सांगितलें.

Passive Resistance प्रमाणें जो कायदा जुलमी व अन्यायाचा असें वाटत असेल तो मोडणें अशक्य झाल्यामुळें दुसरे कायदे मोडण्याचें ठरलें, व त्यांत जे कायदे समाजाचा व राज्यरचनेचा डोलारा उभा राहण्यास

अवश्यक होत तेही मोडण्याचा संभव उत्पन्न झाला. प्रस्तुत लेखकाची तरी समजूत आहे कीं, मोडल्या जाणाऱ्या कायद्याचें क्षेत्र असें विस्तृत होण्याचें एक महत्त्वाचें कारण महात्मा गांधी यांचे मतांत शोधिलें पाहिजे. महात्मा गांधी हे टॉलस्टॉयचे अनुयायी आहेत. हल्लींची समाजाची व राज्यव्यवस्थेची रचना त्यांस मान्य नसून ती मोडून एक तऱ्हेचा समाजसत्तावाद अमलांत यावा असें ते म्हणत आहेत. कांहींनीं धनी व्हावें, कांहींनीं नोकर व्हावें, कांहींनीं शारीरिक कामें करावीं, कांहींनीं करूं नये, वगैरे गोष्टी त्यांस कबूल नाहींत. अर्थात् ज्यांस हल्लींची समाजाची व राज्यव्यवस्थेची रचना नापसंत असून तिचे जागीं अगदीं निराळी रचना फारसा विलंब न लावतां अमलांत आणणें संभवनीय वाटतें त्यांस हल्लींच्या अमदानीकरितां जे कायदे अवश्यक आहेत त्यांविषयीं आदर वाटणार नाहीं व प्रसंगविशेषीं ते अपायकारकही वाटतील ह्यांत नवल नाहीं. यामुळें इतर कायदे मोडण्याचा प्रश्न उत्पन्न होऊन, हल्लींच्या लोकव्यवस्थेंत फारशी उलथापालथ न करूं इच्छिणाऱ्या सामान्य जनांच्या दृष्टीस विस्तृत वाटेल अशी मर्यादा अतिक्रमणीय कायद्यांस त्यांनीं घातली असें मानणें सयुक्तिक दिसतें.

महात्मा गांधी व मिसेस बेझंट यांचेमध्यें मतभेद होता तो यासंबंधाचा होय. रौलेट कायदा कायदे कौन्सिलांतून कोणत्या स्वरूपांत शेवटीं पास होऊन बाहेर पडेल याची नक्की कल्पना तो पास होण्यापूर्वीं कोणासही नव्हती. कारण त्यावेळीं सिलेक्ट कमिटींत त्याची छाननी चालू होती. अशा स्थितींत तुम्हीं गांधी यांच्या शपथेवर सही कराल काय असा, मिसेस बेझंट यांस प्रश्न विचारण्यांत आला, तेव्हां बाईंनीं इतर कायदे मोडण्याविषयींची शपथेंतील अट खोडून टाकून त्या शपथेवर सही केली. पुढें रौलेट कायदा मोडणें अशक्य आहे हें स्पष्ट झालें, तेव्हां मिसेस बेझंट व महात्मा गांधी यांच्यामधील मतभेद अधिक तीव्र झाला. बाईंचें म्हणणें असें होतें कीं, इतर कायदे मोडण्याची मुभा हानिकारक आहे, सरकारांत आणि समाजरचनेंत जरी कितीही दोष असले तरी बहुजनसमाजाचा कायद्याविषयीं जो आदर आहे त्यामुळेंच सरकार आणि समाज चालूं शकतो. महात्मा गांधींसारख्या फार विचारी माणसांची किंवा सत्याग्रहाच्या शपथेवर पूर्ण विचार करून सही करणारांची गोष्ट जरी स्वतंत्र असली तरी, आम्हीं रौलेट कायद्याशिवाय इतर कायदेही मोडूं, जे कायदे पूर्वीं आम्हीच मान्य करीत होतों

तेही मोडूं, कोणते कायदे मोडावयाचे हें आमचें आम्हींच ठरवूं व आम्ही नीतीविरुद्ध वर्तणार नाहीं या एका गोष्टीखेरीज कायदे मोडण्याच्या बाबतींत आम्हीं कोठलीही गोष्ट ओळखत नाहीं असा सत्याग्रहाच्या शपथेचा उघड उघड अर्थ होत असल्यानें त्याचा अज्ञ बहुजनांवर भलताच परिणाम होईल, त्यांचा बुद्धिभेद होऊन भलत्याच गोष्टी त्यांच्या हातून घडतील असें मिसेस बेझंट यांचें म्हणणें होतें. सामान्य माणसाच्या मनांत 'कायदा' व ' सुव्यवस्था ' यांविषयीं जी भावना समाजानें उत्पन्न केलेली असते तिचे मुळाशीं आघात करून ती निर्बल केल्यास, सत्याग्रही लोकांच्या हातून त्यांची इच्छा नसतांनाही, समाजांत भलतेंच बीज पेरलें जाऊन त्यास अत्याचारादिकांचीं तात्काळ कडू फळें येतील, अशी मिसेस बेझंट यांस धास्ती वाटत होती. सर्व लोक गांधींइतके विचारी आणि शांत असत नाहींत. या चळवळीचें नैतिक पाठबळ ओळखण्यास जी पात्रता लागते ती बहुजनसमाजास नाहीं. सत्याग्रहाच्या मार्गांत कांहीं अडचण उत्पन्न झाल्यास हा अज्ञ समाज खवळून ही चळवळ भलत्याच मार्गावर नेईल असें बाईंनीं अगोदरच वारंवार प्रतिपादिलें होतें. महात्मा गांधी यांचें यावर असें म्हणणें पडलें कीं, हिंदुस्थानांतल्या लोकांवर अध्यात्मवृत्तीचा पगडा पुष्कळ आहे, व सत्याग्रहाच्या चळवळीचें तपःसामर्थ्य असें आहे कीं, असले दुष्ट परिणाम होणारच नाहींत. इतकेंच नव्हे तर, जर ते होण्याचा संभव असेल तर तोही सत्याग्रहाच्या प्रभावानें नाहींसा होईल !

मिसेस बेझंट यांचें दुसरें असें म्हणणें होतें कीं, सर्व जगाची व हिंदुस्थानची स्थिति इतकी अस्वस्थ झालेली आहे कीं, आज परिस्थिति फार नाजूक झाली आहे. चारपांच वर्षभर माजलेली लढाई, रशियन राज्यक्रान्तीनंतर सर्वत्र पसरणारी बोल्शेविझमची लाट, जगभर झालेली महागाई, हिंदुस्थानांतील अवर्षण, हिंदुस्थानांत व इतरत्र झालेले मजुरांचे संप, इत्यादि अनेक कारणांनीं, सहज क्षुब्ध होईल अशी लोकांची मनःस्थिति झालेली आहे. सर्व प्रकारें हवालदील झालेल्या लोकांत ही चळवळ मोठ्या प्रमाणावर सुरू केल्यास अस्वस्थता माजण्यास उशीर लागणार नाहीं. या दोन कारणांस्तव गांधी यांच्या विरुद्ध असणारे आपले विचार, भीडमुरवत न धरतां व आपलें म्हणणें लोकांस कितपत गोड वाटेल हा स्वार्थी विचार मनांत येऊं न देतां मिसेस बेझंट यांनी एकसारखें प्रतिपादिलें.

ही वर लिहिलेली विचारसरणी मिसेस बेझंट यांची आहे. ती आम्हांस बरोबर वाटते. पण ती जरी कोणास बरोबर वाटत नसली तरी ती इतकी वेडगळपणाची खास नाहीं कीं, तीसाठीं मिसेस बेझंट यांच्या प्रामाणिकपणाबद्दल संशय घेण्याची अवश्यकता आहे. मिसेस बेझंट यांच्या बुद्धिमत्तेचीच परीक्षा करावयाची असली तर नुकत्याच झालेल्या गोष्टीवरून त्यांचीच बुद्धिमत्ता जास्त विश्वसनीय आहे असें दिसून येतें. ज्याच्या बोलण्याची प्रचीति येते तो मनुष्य अधिक विश्वसनीय समजला पाहिजे ही कसोटी मिसेस बेझंट व इतर पुढारी यांस लावून पाहिली असतां मिसेस बेझंट या जशा कसास उतरतील तसे इतर उतरणार नाहींत हें कोणाही निःपक्षपाती मनुष्यास कळून येण्याजोगें आहे. सैन्याच्या पुढाऱ्याप्रमाणें-सेनापतीप्रमाणें—राष्ट्राच्या पुढाऱ्याच्या अंगीं नुसतें शौर्य असून भागत नाहीं. शौर्याबरोबर धोरण आणि शहाणपणा हे गुणही त्याचे अंगीं अवश्यक असतात. नेपोलियन जितका शूर होता तितकाच किंवा त्याहून अधिक तो धोरणी होता म्हणून तो खरा पुढारी. ऑस्टरलीझची लढाई होण्याचे अगोदर तेथील जागेची टेहेळणी करतांना, येथें शत्रू तळ देईल, या टेंकडीवर तो अमुक हिकमती योजील, या जागीं मी त्यांवर अमुक डावपेंच टाकीन, व या चढावावर तो मला शरण येईल असा त्यानें आपल्या धोरणावर अजमास बांधिला, इतकेंच नव्हे तर त्या धोरणाच्या अनुरोधानें त्यानें कांहीं टेकड्यांजवळील जागा खणून आपणांस हवी तशी केली व पुढें नेपोलियनच्या अजमासाप्रमाणें सर्व गोष्टी नाटकांतल्या संविधानकाप्रमाणें घडून येऊन त्याची फत्ते झाली म्हणूनच तो मोठा सेनापती. जी गोष्ट सामान्य लोकांस समजते तीच गोष्ट जर पुढाऱ्यास समजत असेल तर सामान्य मनुष्य व लोकनायक यांत फरक काय? सामान्य मनुष्यास जी गोष्ट समजत नाहीं ती ज्यास समजते व त्याप्रमाणें धोरण बांधून जो आपलें दूरदर्शित्व खरें करून दाखवितो तो खरा पुढारी होय. झाड पाहिल्यावर त्याचीं फळें तोडणारा मनुष्य बागवान नव्हे तर बीज पाहिल्यावर जो वृक्षाचा अचूक अजमास करतो तो खरा बागवान होय. विजेचा प्रचंड गडगडाट, ढगांची भयंकर काळोखी व समुद्राचा नितान्त क्षोभ दृष्टिगोचर झाल्यानंतर वादळांत आपण सांपडलों आहों हें लक्षांत येऊन जो सुकाणाकडे धांव घेतो तो नावाडी नव्हे तर क्षितिजावर टीचभर रुंदीचे ढग आलेले पाहून त्याच्या लक्षणावरून

जो वादळाचें धोरण बांधतो, तें येण्याच्या अगोदर जो आपलें सुकाणूं बळ्ठ धरितो, व पूर्वतयारी असल्यामुळें वादळांतून शौर्यानें निभावतो तो खरा नावाडी. सूर्य उगवल्यावर तो सर्वांसच दिसतो तो दाखविण्यास पुढारी लागत नाहीं. पण पहाट फुटण्याच्या पूर्वी सूर्योदयाची घटका निश्चित करण्यास बुद्धीचा धड धोरणाचा खोल पुढारी पाहिजे असतो. या दृष्टीनें पाहिल्यास मिसेस बेझंट यांची विशाल बुद्धि आपल्या वेंधेंत गुंतागुंतींचे मोठमोठे प्रश्न धरूं शकते हें सिद्ध करणें कठीण नाहीं. १९१७ च्या डिसेंबरमध्यें युरोपीय महायुद्धाचें काय होणार याचा कोणासही थांग नव्हता. त्यावेळीं कॉंग्रेसच्या अध्यक्षपीठावरून बाई म्हणाल्या, " राजकारणी माणूस या नात्यानें नव्हे तर अध्यात्मशास्त्रज्ञ या नात्यानें मी सांगतें कीं, मला या लढाईच्या निकालाविषयीं शंका वाटत नाहीं. एकतंत्री सत्तेचा नाश व्हावा यासाठीं ही लढाई आहे. राज्यकारभारांत तसेंच लढाईंतही एकमुखी सत्ता लोकसत्तेइतकी कार्यक्षम नाहीं हें ठरून एकमुखी सत्तेवरील जनतेचा विश्वास उडाल्याशिवाय लढाई संपणार नाहीं. एकमुखी सत्तेनें तात्पुरता फायदा व यश लढाईंत प्रारंभीं मिळतें पण तें खरें नव्हे, या लढाईंत ही सत्ता नाश पावणार आहे. " त्यावेळीं जर्मनींतील लोक कैसरला कंटाळून आपणच पदच्युत करतील व त्यानंतर लगेच हें युद्ध संपेल अशी कल्पना कोणाच्याही ध्यानीं नव्हती, हें लक्षांत ठेवून वरील शब्द वाचल्यास जगाचे प्रचंड प्रश्न उलगडण्यांत बाईंची बुद्धि किती कुशाग्र आहे याचा वाचकांस अजमास करतां येईल. कॉंग्रेसमध्यें अशा प्रकारचें विधान बाईंनीं १९१७ च्या डिसेंबरांत केलें. पण थिऑसफिकल वाङ्मयांत हेच विचार १९१४ च्या आक्टोबरांत म्हणजे लढाई सुरू होऊन दोनतीन महिन्यांतच त्यांनीं प्रकट केले होते हें लक्षांत ठेविल्यास वाचकांस अधिकच आश्चर्य वाटेल. महात्मा गांधी व मिसेस बेझंट यांचा सत्याग्रहाविषयींचा मतभेद या लेखांत पूर्वीच नमूद करण्यांत आला आहे. त्या बाबतींतही सत्याग्रहाच्या चळवळीचा भलतेच लोक फायदा घेऊन अस्वस्थता उत्पन्न करितील हें मिसेस बेझंट यांचें भविष्य खरें ठरलें. महात्मा गांधी यांनीं आपल्या सत्यनिष्ठ स्वभावास अनुसरून असें सार्वजनिक रीत्या कबूल केलें आहे कीं, जनसमूहामध्यें कुमार्गीवृत्ति किती आहे याचा जो मीं अजमास केला होता तो चुकीचा ठरला.

आणखी एका बाबतींतही याचप्रमाणें मिसेस बेझंट यांचें धोरण खरें ठरल्याचा अनुभव नुकताच आला आहे. गेल्या वर्ष सव्वावर्षभर जे लोक

मिसेस बेझंट यांचें न्यू इंडिया पत्र काळजीनें वाचीत आले असतील त्यांस हें माहीत आहे कीं, त्यांच्या मतें हा काळ असा आहे कीं, हिंदुस्थानाबाहेरच्या लोकांकरवीं हिंदुस्थानांत अस्वस्थता उत्पन्न होणें असंभवनीय नाहीं. गुदस्त सालीं Citizen Army या विषयासंबंधानें त्यांनीं जे लेख लिहिले होते त्यांत अस्वस्थता उत्पन्न होण्यासंबंधानें त्यांचें मत स्पष्ट करण्यांत आलें आहे. जेव्हां सत्याग्रहाची चळवळ सुरू होऊन त्या चळवळीचें निमित्त करून लाहोर, अमृतसर, दिल्ली, अमदाबाद, विरमगांव इत्यादि ठिकाणीं लोकांकडून अत्याचार व सरकारकडून दडपशाही होत होती त्या वेळेसच मिसेस बेझंट यांनीं वारंवार सांगितलें कीं, लोकांच्या या दंग्यांत इतर दंग्यापेक्षां कांहीं अधिक, कांहीं निराळें असेल अशी शंका येते, नुसत्या राजकीय कारणांनीं चिडलेले लोक रेलवेचे रूळ उपटणें, तारायंत्राच्या तारा तोडणें, सरकारी इमारती व ऑफिसें जाळणें, वगैरे गोष्टी करतील असें मला वाटत नाहीं. यांत बाहेरच्या लोकांचा कदाचित् संबंध असावा. सांप्रतचा काळ माझ्या मतानें असा आहे कीं, बाहेरच्या लोकांचें परचक्र हल्लीं येऊं शकेल. अशा प्रकारचीं मतें प्रतिपादण्याचा जेव्हां मिसेस बेझंट यांनीं प्रथम उपक्रम केला तेव्हां अत्याचारास नुकतीच सुरुवात होत होती. कित्येक दिवसपर्यंत मिसेस बेझंट यांचें हें म्हणणें चालूच होतें. अशा आणीबाणीच्या वेळीं लोकांच्या पुढाऱ्यांनीं, वक्त्यांनीं, लेखकांनीं व वर्तमानपत्रकारांनीं सरकार व आपण यांमधला भेद विसरून व भांडणें मागें ठेवून सरकारला मनोभावानें मदत करावी, त्यावर फार कडक टीका करूं नये, कडक टीकेनें अस्वस्थ झालेल्या लोकांच्या कृत्यांस सहजासहजीं भलतेंच वळण लागण्याचा संभव असतो, तसें झाल्यास सरकार अधिक कडक होतें, व बुडत्याचा पाय खोलांत या न्यायानें दडपशाहीच्या गर्तेत लोक अधिकाधिक बुडतात. अशी दुःस्थिति टाळण्याकरितां हिंदुस्थानांतील सर्व वजनदार लोकांनीं एकमतानें सरकारास आज आधार द्यावा; जोंवर परकीयांच्या स्वारीची धास्ती आहे, जोंवर अंतःस्थ अत्याचार संशयित स्वरूपाचे वाटत आहेत तोंवर आपण दम धरूं, त्यानंतर आपणांस नोकरशाहीविरुद्ध चळवळ करण्यास मार्ग खुला आहे असा बाईंचा सर्वांस उपदेश होता, तो फारसा कोणास पटला नाहीं. बाई पराचा कावळा करीत आहेत असें पुष्कळांस वाटलें. कित्येक पुढाऱ्यांनीं परचक्राचा संभव वाटण्यास तुम्हांस काय प्रमाणें आहेत असा त्यांस सवालही केला.

इंग्लंडच्या लोकांस फसविण्यासाठीं सरकार लांडगा आला रे आला अशी खोटी बोल्शेव्हिझमची ओरड करीत आहे, व मिसेस बेझंट या त्यास वेड्या-सारखी मान तुकावीत आहेत असें हिंदुस्थानांतील बहुतेक पुढारी म्हणविणारांचें मत पडलें. पण बाईच्या शब्दास पुरा महिना झाला नाहीं तोंच लांडगा खराच आला, व अफगाण सरहद्दीवर काबुलचे अमीर व हिंदुस्थानचें सरकार यांमध्यें युद्ध सुरू झालें. विशाल बुद्धीच्या जोरावर जगाच्या राजकीय परिस्थितीचें यथास्थित अनुमान केल्याचें याहून चांगलें उदाहरण मिळणें कठीण.

हा उपदेश ऐकण्यांत आला असता व जशी महात्मा गांधी यांनीं आपली चळवळ एकदम तहकूब करण्याची द्वाही फिरविली त्याप्रमाणें जर हिंदुस्थानांतल्या सर्व विचारी माणसांनीं आपले सर्व मतभेद तहकूब ठेवण्याचें ठरविलें असतें तर केवढी बहार झाली असती ! हा उपदेश तात्काळ ऐकण्यांत आला असता तर जनतेवर पुढाऱ्यांचें एकदम वजन पडून लोकांस कमी नुकसान सोसणें जरूर होतें, पुष्कळ लोक तुरुंगांत न जाते, पुष्कळ वर्तमानपत्रांची मुस्कटदाबी न होती, पुष्कळ जीव मृत्युमुखीं न पडते. असें झालें असतें तर मि. हॉर्निमन मुंबईत राहिले असते, व लोकक्षोभाचें निमित्त करून नोकरशाहीस दडपशाही करण्यास जें कारण मिळालें तें न मिळून दडपशाहीस आळा पडता; शिवाय ज्या लोकांवर या दडपशाहींत अन्याय झाला असेल त्यांस न्याय मिळण्याचा संभवही अधिक झाला असता. एशियामधील कारस्थानावरून हिंदुस्थानांत उत्पन्न होऊं शकणारा धोका किती आहे, याची अचूक अटकळ करणारे मिसेस बेझंट यांसारखे अधिक पुढारी हिंदुस्थानास लाभले नाहींत हें दुर्दैव होय.

आणि या सर्व घोटाळ्यांत मोठ्या आश्चर्याची गोष्ट ही कीं मिसेस बेझंट, या महत्त्वाकांक्षेस्तव, लोकप्रियतेस्तव, आपलें लोकांवर वर्चस्व राहावें म्हणून आपली मतें प्रतिपादित आहे असें लोक म्हणतात ! जणूं काय महात्मा गांधी यांचे चळवळीस विरोध केल्यानें, दिल्लीकाँग्रेसमध्यें बहुमतानें झालेल्या गोष्टी देशहिताच्या नाहींत असें प्रतिपादिल्यानें, सरकारानें जरी जुलमी रौलट कायदा पास केला असला तरी दोन दिवस दम धरून कडक टीका करूं नका व जरी अधिकारीवर्गानें जुलुमाचीं कृत्यें केलीं तीं कांहीं काळ सोसा असें प्रतिपादिल्यानें मिसेस बेझंट यांची लोकप्रियतेची महत्त्वाकांक्षा

तृप्त होणार होती; या गोष्टी केल्यानें आपण लोकांस अप्रेय होऊं ही साधी गोष्टही त्यांस समजत नाहीं असें त्यांच्या प्रतिपक्षीयांस खरोखरी वाटतें काय ? बाईंनीं असें कण्ठरवानें सांगितलें आहे, कीं माझें धोरण कांहीं पुढाऱ्यांस मान्य आहे. पण त्याचा सार्वजनिक रीत्या आपण स्वीकार करून जर तें नेटानें पुढें चालवूं तर आपण लोकाच्या रोषास पात्र होऊं हें जाणूनच ते मागें राहिले आहेत. व एकट्यानेंच मीं हें अप्रिय काम करावें असा मजवर प्रसंग आहे. जी व्यक्ति आपल्या मतास्तव आपल्या लोकप्रियतेची होळी करण्यास तयार असते ती अधिक निष्काम कीं जी लोकांस भिऊन आपणास खरें वाटतें तें निर्भीडपणें बोलण्यास भिते ती निष्काम, याचा विचार आम्ही आपल्या वाचकांवर सोंपवितों. जर येन केन प्रकारेण लोकांत प्रीति संपादावयाची असती तर लोकछंदानुवर्तनाचा मार्ग बाईस खुला होता. दिल्ली कॉंग्रेसमध्यें बहुमतास मिळून, महात्मा गांधींच्या चळवळीची बाजू धरून, निदान त्याविषयीं गप्प बसून बाई अधिक लोकप्रिय झाल्या असत्या. कॉंग्रेसच्या डेप्युटेशनवर जाण्याचें मतभेदास्तव त्यांनीं नाकारलें तें जर मतभेद त्या बाजूस ठेवित्या तर जरूर न होतें, व कॉंग्रेसच्या वतीनें विलायतेस जाऊन आपली महत्त्वाकांक्षाही त्यांस तृप्त करितां आली असती. हा सोपा मार्ग त्यांनीं सोडेला तो खास लोकप्रियतेकरितां नव्हे. बाईच्या धोरणामुळें व मतामुळें ऑल-इंडिया होमरूलीगमधील कांहीं व्यक्तींस त्या तेथें नकोशा झाल्या व त्यांनीं युक्त्या करून व आंतून सूत्रें ओढून त्यांस राजीनामा देणें भाग पाडिलें. ही महत्त्वाकांक्षा आहे असें कोण म्हणेल ?

मिसेस बेझंट या जशा एका अंगानें राजकारणांतील पुढारी म्हणून प्रसिद्ध आहेत, तशा दुसऱ्या अंगानें अध्यात्मशास्त्रांतील कांहीं अधिकाराची व्यक्ति म्हणूनाहि प्रसिद्ध आहेत. ज्यांस त्यांची प्रत्यक्ष माहिती आहे त्यांस ठाऊक आहे कीं, लोकांनीं चिकटवलेले पुष्कळसे दोष त्यांच्या अंगीं वसत नाहींत. अध्यात्मशास्त्रांत अनुभवद्वारा त्यांची कांहीं प्रगति झालेली आहे व त्यामुळें त्यांच्या बुद्धीस प्रगल्भता व धोरणास खोलपणा हीं जशीं प्राप्त झालेलीं आहेत, तसा वृत्तींत निष्कामपणाही आला आहे. त्या चुकण्याचा संभव नाहीं असें नाहीं. पण लौकिक ज्ञान, लौकिक योग्यता व लौकिक सामर्थ्य यांमध्येंही बाईपेक्षां कमी असणारीं, व अध्यात्मशास्त्राचा उंबरठाही न पाहिल्यामुळें चित्तशुद्धीचा ओनामाही न शिकलेलीं माणसें जितक्या चुका कर-

तील त्यांचेपेक्ष[illegible]च्या हातून कमी चुका होतील असें आम्हांस वाटतें. बाईची लौकिक योग्यता व अध्यात्मिक अधिकार हीं जरी अमच्या मतें बरींच असलीं तरी अंधभक्तीनें त्याचें अनुकरण करावें असें आम्ही म्हणत नाहीं. ज्यानें त्यानें आपल्या सदसद्विवेकबुद्धीचा दिवा हातांत धरून जो मार्ग योग्य दिसेल त्यानें गेलें पाहिजे. पण त्यानें हेंही लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, सदसद्विवेकबुद्धीची ज्योत नेहमीं सारखीच प्रकाशवंत असते असें नाहीं, शांत वेळीं ती जितका प्रकाश देईल तितका प्रकाश वादळांत देत नाहीं. शिवाय नांगऱ्याची सदसद्विवेकबुद्धि, सामान्य माणसाची सदसद्विवेकबुद्धि, स्वार्थत्यागी लौकिक पुढाऱ्यांची सदसद्विवेकबुद्धि, व लौकिक पुढारीपण व अध्यात्म अधिकार हीं ज्या व्यक्तींत एकवटतात अशाची सदसद्विवेकबुद्धि या उत्तरोत्तर अधिक प्रकाशवंत असतात. उत्क्रान्तिमार्गांत सदसद्विवेकबुद्धि विकास पावते, अधिक कार्यक्षम होते, व कमी चुका करिते. यासाठीं जरी आपली सदसद्विवेकबुद्धिच कायती आपणांस वाट दाखवूं शकेल, त्या कामीं जरी दुसऱ्याची विवेकबुद्धि कामास येणार नाहीं, तरी जी काय आपली सदसद्विवेकबुद्धि असेल ती आपण शक्य तितकी शुद्ध, प्रकाशवंत व सामर्थ्यवान् केली पाहिजे. हें कर्तव्य जर प्रत्येक माणूस करील तर चुकी झाल्यास त्यानें फिकीर करण्याचें कारण नाहीं, अशी सदसद्विवेकबुद्धि जो मार्ग दाखवील तो प्रत्येकानें बिनधोक अनुसरावा. मग इतर थोर माणसांच्या मताप्रमाणें तो मार्ग योग्य असो किंवा नसो. अशा रीतीनें सदसद्विवेकबुद्धि विकसित करण्याचा मनुष्यानें एकसारखा प्रयत्न केल्यास व चित्तशुद्धीचा मार्ग त्यानें निश्चयानें चोखाळल्यास पुढें असा मौजेचा अनुभव त्यास येतो कीं, उत्क्रांतिमार्गांत आपणापेक्षां पुढें असलेल्या माणसांची सदसद्विवेकबुद्धि व आपली सदसद्विवेकबुद्धि यांचे निर्णय हळूहळू सारखे होऊं लागतात व आपणांत व त्यांच्यांत मतभेद उत्पन्न होण्याचे प्रसंग कमी कमी होत जाऊन शेवटीं अगदीं नाहींसे होतात. ज्याची अशी स्थिति होत असेल तो धन्य होय.

मिसेस बेझंट यांचे डोक्यावरील हल्लींचें वादळ ओसरण्यास आतांच सुरुवात होत आहे. लोकनिंदेच्या व लोकप्रियतेच्या शिखरावर आळीपाळीनें बसण्याचा प्रसंग त्यांस अनेकवार येतो व अशा दोन्हीं प्रसंगांतून आपल्या बुद्धीस जें खरें दिसतें त्याप्रमाणें वर्तन करीत त्या नेहमीं सुरक्षितपणें बाहेर आल्या

आहेत. मि. जे. कृष्णमूर्ति यांचे संबंधीं मद्रास हायकोर्टांत [illegible] चालून जेव्हां मिसेस बेझंट यांचे अंगावर बाजू आली त्यावेळेस हिंदी लोकांस ती सर्व बाईच्या अवतारकृत्याचा पोरखेळ वाटून त्यांचें डोकें या लोकनिंदेच्या वादळांतून वर निघत नाहीं अशी त्यांची अटकळ होती. त्या तुफानाचे वेळीं जर कोणी असें भविष्य सांगता कीं, थोडक्याच अवधींत बाई लोकपक्षाच्या पहिल्या प्रतीच्या पुढारी होतील, व कॉंग्रेसच्या अध्यक्षपदावर बहुतेक एकमतानें निवडल्या जातील तर लोकांनीं त्यास वेड्याच्या इस्पितळांचा मार्ग दाखविला असता ही अशक्य गोष्ट जशी लवकरच शक्य झाली तशी आज वाटणारी अशक्य गोष्टही कांहीं काळानें शक्य होऊन आजचें तुफानही लवकर थंडावेल व राजकीय चळवळीचें बाईचें तारूं सुखरूपपणें बंदरास लागेल असें आमच्या दृष्टीस दिसत आहे.